# न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्याया.क्र.३, अंबड यांचे न्यायालयात

सं.फौ.खटला क्र.७०३/२०२२
नि.क्र.०३

| | | |
|---|---|---|
| १. अपराध घडल्याची तारीख | :– | ०८/१०/२०२२. |
| २. अहवालाचा / फिर्यादीची तारीख | :– | ०८/१०/२०२२. |
| ३. फिर्यादीचे नांव, वय व त्याचे | :– | प्रमोद पांडूरंग पावसे, वय ३३ वर्ष, नोकरी, पोलीस ठाणे गोंदी |
| ४. आरोपीचे नांव, वय व पत्ता | :– | अशोक बळीराम मोताळे, वय ३० वर्षे, रा. कुक्कडगाव ता.अंबड जि.जालना |
| ५. अपराधाचे कलम | :– | भा.दं.वि. कलम २८३ अन्वये शिक्षापात्र. |

६. आरोपीचे प्रतिकथन :– तुम्ही दि. ०८/१०/२०२२ रोजी १४.३० वा.च्या सुमारास मौजे सुखापुरी येथील बस स्टँड समोर सार्वजनिक ठिकाणी आपले ताब्यातील छोटा हत्ती हे वाहन क्र.एमएच–०४–एई–८९७६ हे वाहन रस्त्यामध्ये असुरक्षीतरित्या लावून सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण करुन अपघात होऊन लोंकाच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने अवाजवी काळासाठी उभी करून तुम्ही भा.दं.वि.चे कलम २८३ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न–१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय?
उत्तर. होय.
प्रश्न–२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?
उत्तर. होय.
प्रश्न–३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर. मला गुन्हा कबुल आहे .

दिनांकः–११/१०/२०२२.

समक्ष,

––––––––––––––
आरोपीची सही

(**दि.मु.गायकवाड**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अंबड
अंबड .

आरोपी हा आज न्यायालयापुढे हजर असून आरोपीने त्याचे विरुध्द नोंदविण्यात आलेला गुन्हा स्वेच्छेने कबूल केलेला आहे. आरोपीने सदरचा गुन्हा स्वेच्छेने कबूल केल्यानंतर त्याबाबत होणारी शिक्षेबाबत त्याला स्पष्टीकरण विचारले असता त्याने निवेदन केले की त्याची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असून तो कसेबसे मजुरीचे काम करुन स्वतःचा चरिताथ चालवितो. आरोपी हाच त्यांच्या कुटूंबातील कमविता असून आरोपीच्या कुटूंबातील लोक आरोपीवर व आरोपींच्या कमाईवर अवलंबून आहेत- त्यामुळे आरोपीने कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती केली- विदवान सरकारी वकिल यांनी युक्तीवाद केला की गुन्हयाचे स्वरुप व आरोपीचे निवेदन लक्षात घेता योग्य तो आदेश पारीत करावा- आरोपीविरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप त्यांनी मांडलेले म्हणणे विचारात घेता] मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे-

**<u>आदेश</u>**

आरोपी – **अशोक बळीराम मोताळे** यास भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(२) अन्वये दोषी धरण्यात येत आहे व त्यास सदर गुन्ह्यासाठी रक्कम रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास दोन दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

दिनांक ११/१०/२०२२
अंबड

(**दि.मु.गायकवाड**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अंबड
अंबड .